# धृष्ट - शांता शेळके

मराठी काव्य-विश्वातील एक सुंदर, डौलदार आणि तरल भावरम्य वळण म्हणजे शांता शेळके आणि त्यांच्या कविता. जितक्या त्यांच्या कविता तरल आणि भावरम्य तितकेच त्यांचे व्यक्तिमत्वही रेशमी आणि भावमधुर होते. त्या व्यक्तिमत्वाचा रंगच काव्यात्म होता. त्यामुळे त्यांचे गद्यलेखनही याच संवेदनेतून जन्माला आले आहे, असे दिसते. कोणाही प्रतिभावंताच्या अंतरी निर्मितीची एक उर्मी असते. तो आपल्या प्रतिमेच्याद्वारे कोणत्याही रूपात आत्माविष्कार करत असतो. १९२२ साली महाराष्ट्रातल्या पुणे जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला. महाविद्यालयीन शिक्षण पुण्यासारख्या विद्यानगरीत झाले. साहित्यिक वातावरणामुळे, गाण्याच्या अंगाने जाणाऱ्या कवितेतून शांताबाई अगदी तरुण वयापासूनच व्यक्त होऊ लागल्या. १९४७ साली त्यांचा 'वर्षा' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. १९४७ पूर्वीच्या काळातील रविकिरण मंडळाचा व तत्कालीन कवींचा शांताबाईंवर विशेष प्रभाव होता. त्यातल्या त्यात माधव ज्युलियनांचा तर शांताबाईंवर चांगलाच प्रभाव होता. त्यांच्या कवितांमुळे शांताबाई विलक्षण भारून गेल्या होत्या. त्यांच्या मते ज्युलियनांच्या काव्याने त्यांच्या पिढीला स्वप्नाळूपणा, भावुकता आणि आदर्शवाद प्रत्यक्ष दाखवून दिला. परंतु पुढे शांताबाईंवर बा.सी.मर्ढेकर या नवमतवादी कविनेही मोहिनी घातल्याचे दिसते. मर्ढेकरांच्या काव्याविषयी त्या म्हणतात, ''कविता ही एक काळजाला झोंबणारी, जीवन व्यापून टाकणारी, स्वत:कडे आणि जगाकडे बघण्याची अगदी वेगळी दृष्टी देणारी शक्ती आहे....... हे मर्ढेकरांच्या कवितेने तीव्रतेने जाणवून दिले. मला आणि माझ्या पिढीतल्या अनेकांना रविकिरण मंडळाच्या छायेतून ओढून आणण्याचे कार्य मर्ढेकरांच्या कवितेने केले, यात शंका नाही.'' ('धूळपाटी' या पुस्तकातून) असे असले तरी शांताबाईंच्या काव्यात सुमधुर गेयता, साधी परंतु सौंदर्यपूर्ण शब्दरचना, भावरम्यता या खास पारंपारिक काव्यगुणांचा गोडवा आहेच. या गुणांबरोबरच एकाकीपणा, वैफल्य, जीवनातील निरर्थकता या वास्तवांचाही आशय त्यात खोलपणे आढळतो.

या ठिकाणी त्यांची एक अशीच निसर्गरम्य परंतु तरीही मानवी भावभावनांनी गुंफलेली एक सुंदर कविता आपण पाहणार आहोत - ''धृष्ट''! धृष्ट म्हणजे उद्धट किंवा ढालगज.

कणखर वक्षावर माळाच्या
तृप्तपणाने विसावलेली
सांज मदालस,
        इंद्रधनूने नभी उभविली
        पीत, केशरी, निळी, जांभळी
        कमान राजस.
एकांताचा भंग न व्हावा
म्हणून परतला हलक्या पायी
वारा तिथुनी,
        नजर आपुली दूर वळविली
        गवततुऱ्यांनी, निळ्या झऱ्यांनी
        लज्जित होऊनी.
श्वास आवरूनि निवांत झाले
तिमिरामध्ये मिटू लागले
वृक्ष पुराणे,
        सळसळणाऱ्या फांद्यानीही
        पालवित रोधुनी ठेविले
        अपुले गाणे.

निश्चल राने, निश्चल राई
आभाळाची गहन निळाई
संथ ठिबकता,
कोण कुणामधि बुडते आहे?
कुण्या व्रताची होते आहे
आज सांगता ?
असा अलौकिक रम्य सोहळा
बघतांना ती मीलन वेळा
भरले डोळे,
आणि वाटले भलत्या वेळी
नको तिथे मी धृष्टपणाने
उगाच आले.

वरील कविता सहज वाचत गेले तरी कवितेच्या प्रत्येक कडव्यात निसर्गाच्या एकेका घटकाचे वर्णन आहे.

पहिल्या कडव्यात

कणखर वक्षावर माळाच्या
तृप्तपणाने विसावलेली
सांज मंदालस,

माळावर फिरणाऱ्या कवयित्रीला सांजवेळ झालेली दिसू लागते. हे अत्यंत साधे दृश्यं कवयित्रीच्या प्रतिभाशाली डोळ्यांना किती वेगळे दिसते, आणि ज्या शब्दात ती ते चित्र व्यक्त करते, ते शब्द त्या दृश्याला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जातात. येथे 'कणखर माळ' हा 'पुरूष' प्रतिमेत तर 'मदालस सांज' ही 'स्त्री' प्रतिमेत उभे राहतात, आणि एकांतात एकमेकांच्या आधारे विसावलेले ते एक प्रणयी युगुल आहे, हा आभास ते सारे शब्द चित्रातून उभा करतो.

इंद्रधनूने नभी उभविली
पीत, केशरी, निळी, जांभळी
कमान राजस.

या अपूर्व मीलनासाठी आपली सप्तरंगी शोभिवंत कमान घेऊन इंद्रधनु उभे राहिलेले आहे, ही कल्पना कवयित्री करते. अडीच ओळीच्या कडव्यात वर्णिलेली रंगांची उधळण इंद्रधनुचे प्रत्यक्ष चित्रच आपल्यापुढे उभे करते.

माळ आणि तृप्त सांजवेळ यांच्या मीलनात आपला बोचरा अडथळा नको म्हणून सारा निसर्गच कसा हळूहळू शांत होत जातो, आपला पदरव थांबवतो याचे सुरेल वर्णन पुढील प्रत्येक कडव्यात केलेले आहे. शांताबाई लेखणीच्या जागी जणू कुंचला वापरतात की काय, एवढी त्यांची काव्यशैली चित्रात्मक आहे.

एकांताचा भंग न व्हावा
म्हणून परतला हलक्या पायी
वारा तिथुनी,

त्या युगुलाच्या एकांताचा भंग होऊ नये म्हणून वाराही हलक्या पावलाने तिथून परततो.

नजर आपुली दूर वळविली
गवततुऱ्यांनी, निळ्या झऱ्यांनी
लज्जित होऊनी.

गवताचे तुरे आपली नजर वळवतात. ते उलट दिशेला डोलू लागतात. निळ्याशार पाण्याचा झरा जणू काही लाजून खाली मान घालून मंदपणे वाहू लागतो.

श्वास आवरूनि निवांत झाले
तिमिरामध्ये मिटू लागले
वृक्ष पुराणे,

आसपासचे थोरले वृक्ष वाढणाऱ्या अंधारात स्वत:ला मिटून घेतात. ते निवांत झाले म्हणजे जणू त्यांनी आपल्या श्वासांनाही आवरून घेतले आणि हळूच आपला अडसर दूर केला.

सळसळणाऱ्या फांद्यानीही
पालवित रोधुनी ठेविले
अपुले गाणे.

पानांची होणारी सळसळही थांबली. जणू त्यांच्या या गाण्याचा आवाज माळ आणि सांजेच्या मीलनात बाधा आणणारा होता.

निश्चल राने, निश्चल राई
आभाळाची गहन निळाई
संथ ठिबकता,

सारं रान, वृक्षराजी अगदी जणू स्तब्ध झाली आहे. एवढेच काय पण आभाळाची अथांग निळाई जणू काही संथपणे खाली ठिबकते आहे. कोणालाही त्या मीलन सोहोळ्याचा एकांत मोडायचा नाहीए. त्या प्रणयी युगुलाला तो मीलन-सोहोळा भोगण्यासाठी पूर्ण एकांत देण्याचा मोहक उमदेपणा शांताबाई इथे साऱ्या निसर्गालाच बहाल करतात.

कोण कुणामधि बुडते आहे?
कुण्या व्रताची होते आहे
आज सांगता ?

या मीलनात कोण कोणामधे विरून जात आहे? असा प्रश्न कवयित्रीला पडलेला आहे. म्हणजे आतुरलेली सांज माळात विरघळते आहे की कणखर माळ तिला आपल्या विशाल वक्षावर सामावून घेतो आहे? जणू काही या क्षणासाठी कुणी व्रत केले होते, आणि आज त्या व्रताची सांगता होते आहे. एवढा हा सोहळा कवयित्रीला मंगलमय वाटतो आहे.

असा अलौकिक रम्य सोहळा
बघतांना ती मीलन वेळा
भरले डोळे,

म्हणूनच या नितांत सुंदर सोहळ्याचे साक्षी होताना तिचे डोळे भरून आले आहेत. दु:खाच्या क्षणी माणसाचे डोळे जसे अश्रू गाळतात तसेच ते सुखाच्या क्षणीही भरून येतात. संध्यासमयीच्या त्या रमणीय निसर्गदृश्याचा तिच्या मनाला, सर्वांगाला इतका आनंद झाला की त्या आनंदाने तिचे डोळे भरून आले.

आणि वाटले भलत्या वेळी
नको तिथे मी धृष्टपणाने
उगाच आले.

आणि एखाद्या युगुलाच्या शुभमीलनसमयी चुकून जरी कोणी प्रवेश केला तरी त्याला फार ओशाळवाणे वाटते. माळ आणि सांजेच्या या मीलनसमयी आपण अगदी आगाऊपणे, उद्धटपणे येणे इथे कशाला बरे केले? अशी एक शरमेची भावना कवयित्रीच्या मनी दाटून येते. यातच तिचे त्या निसर्गदृश्याशी संपूर्णपणे विरघळून जाणे स्पष्ट होते. हे पाहून आपण खरोखरी थक्क होतो.

ही समग्र कविता म्हणजे 'चेतनगुणोक्ती' या अलंकाराचे सुंदर उदाहरण आहे. यामध्ये निर्जीव वस्तु सगुण

आहेत अशी कल्पना करून त्यांच्या कृतीचे वर्णन केले जाते. या कवितेत माळ, सांज, वृक्ष, वारा, गवत, झरा, पाने ही स्थिर सृष्टी सजीवाप्रमाणे कृती करत आहेत, असे वर्णन कवयित्रीने केले आहे.

शांताबाईंची विलक्षण प्रतिमा, त्यांचे भाषा सौंदर्य, त्यांचा भावाविष्कार या कवितेला लावण्याची एक झळाळी प्राप्त करून देतो, आणि त्या काव्यप्रकाशात आपणही नकळत हरवून जातो.

सौ. जयश्री नातू

मोबाईल : ९६५७०३२५२७

jayashrinatu@gmail.com